| | | |
|---|---|---|
| MHYA100011622016 | दाखल तारीख<br>नोंदणी तारीख<br>निकाल तारीख<br>कालावधी | १६/०८/२०१६<br>१९/०८/२०१६<br>३०/०५/२०२६<br>०९ वर्ष ०९ महिने १४ दिवस |

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, केळापूर यांचे न्यायालयात
## (पिठासीन अधिकारी श्रीमती ए.एम.कासीम)

**नियमित फौजदारी ख.क्र. १४८/२०१६** **निशानी क्र. १२१**

**अभियोगपक्ष** :– महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पांढरकवडा, ता.केळापूर
जिल्हा यवतमाळ.

**–वि–**

**आरोपी** :–

१. **संदिप चंदमणी ठमके**
वय ४० वर्ष, व्यवसाय – शेत मजूरी,
रा. करंजी रोड, ता. केळापुर, जि. यवतमाळ

२. **आनंद भारत बेसेकर**
वय २९ वर्ष, व्यवसाय – शेत मजूरी,
रा. करंजी रोड, ता. केळापुर, जि. यवतमाळ

३. **श्रीमती यशोदाबाई भारत बेसेकर**
वय ५५ वर्ष, व्यवसाय – शेत मजूरी,
रा. करंजी रोड, ता. केळापुर, जि. यवतमाळ

४. **गर्जन बिरबल खैरे**
वय ४१ वर्ष, व्यवसाय – शेत मजूरी,
रा. करंजी रोड, ता. केळापुर, जि. यवतमाळ

५. **मुनिंद्र बिरबल खैरे (मयत)**
वय ३८ वर्ष, व्यवसाय – शेत मजूरी,
रा. करंजी रोड, ता. केळापुर, जि. यवतमाळ

**दोषारोप :— कलम ३५४—ब, २९४, १४३, १४७, ५०६ सहकलम १४९ भारतीय दंड विधान अंतर्गत**

.....................................................................................................

**श्री. पी. एस. गजभिये, अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता**
**श्री. डी. एस. भगत, आरोपींतर्फे वकील**

.....................................................................................................

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of Offence) | ११/०८/२०१६ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | ११/०८/२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of charge-sheet) | १६/०८/२०१६ |
| दोषारोप / प्रतीकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge) | १८/०६/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of Commencement of evidence) | ०१/०७/२०१९ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक (Date on which judgment is reserved) | ३०/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the judgment) | ३०/०५/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of the sentencing Order, if any.) | ----------- |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नांव (Name of Accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of Arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of Release on Bail) | कलम (Offences charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असलयाची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of Detention Undergone during Trial for purpose of Section 428 Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संदिप चंदमणी ठमके** | १२.०८.२०१६ | १२.०८.२०१६ | ३५४—ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | -- | —— |
| २. | **आनंद भारत बेसेकर** | १२.०८.२०१६ | १२.०८.२०१६ | ३५४—ब,२९४, १४३, १४७, | निर्दोष मुक्तता | -- | —— |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १४९, ५०६ भा.द.वी. | | | |
| **३.** | **श्रीमती यशोदाबाई भारत बेसेकर** | १२.०८.२०१६ | १२.०८.२०१६ | ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | –– | –– |
| **४.** | **गर्जन बिरबल खैरे** | १२.०८.२०१६ | १२ .०८.२०१६ | ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | –– | –– |
| **५.** | **मुनिंद्र बिरबल खैरे (मयत)** | –– | २२.०८.२०१६ | ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ३० मे, २०२६ रोजी घोषीत)

१. आरोपी विरूध्द कलम ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भारतीय दंड विधान अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयाकरीता सदरचे प्रकरण चालविण्यात आले.

२. अभियोग पक्षाची घटना अशी आहे की :–

दि.११.०८.२०१६ रोजी ५.३० वा. च्या दरम्यान फिर्यादी तिच्या घरी स्वयंपाक करीत होती. फिर्यादीचे पती, सासु, मुलगा व फिर्यादीची सासू यांची तब्येत बरी नसल्याने त्यांची ननद उमा पेटकर ही त्यांना भेटण्यासाठी आली होती. त्यावेळी फिर्यादीचे घ राचे पुढे राहणारा संदीप ठमके हा फिर्यादी व त्यांच्या घरामधून जाणा–या ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक रोडवर उभा होवून 'साली पोलीस पाटलीण माझ काय वाकड करते, मी पाहून घ ेतो, तिले माझच घर सापडल का, गावातली दारू बंद का करीत नाही, माझ का उपडते का ? असे म्हणून शिवीगाळ करीत होता. फिर्यादीने बाहेर येवून आरोपीला 'तु कोणाला

शिवीगाळ करीत आहे असे विचारले असता', त्याने 'मी तुलाच शिवीगाळ करीत आहे असे म्हणून मोठी आली पोलीस पाटील माझ काय करायच ते करून घे' असे म्हणून व फिर्यादी जवळ येवून फिर्यादीची ओढणी ओढली व माझेवर बलात्काराची केस लावते का असे म्हणून फिर्यादीचे अंगावर धावून आला, तेव्हा फिर्यादीचे पती पुढे येवून संदिप ठमके याला 'तु तिची ओढणी का ओढली' असे म्हणाले असता संदिपने त्यांची मान पकडली ती फिर्यादी व त्यांच्या घरच्यांनी कशीबशी सोडवली. तेवढयात फिर्यादीचे घराचे बाजूला राहणारे व लपून दारू विकणारे आरोपी यशोदा बेसेकर, आनंद बेसेकर, मुनींद्र खैरे व गर्जन खैरे हे त्यांच्या घ राचे बाहेर आले व तु आमचीच दारू का पकडून दिली तुला माणस लावून मारून टाकतो, तु आमचे काहीच वाकड करू शकत नाही असे फिर्यादी व फिर्यादीच्या पतीला धक्काबुक्की केली. तेवढ्यात करंजी ओ.पी. चे कर्मचारी सचिन मरकाम तेथे आले. त्यांना पाहून यशोदा बेसेकर, आनंद बेसेकर, मुनींद्र खैरे व गर्जन खैरे हे चार जन तेथून निघून गेले व संदीप ठमके हा तेथेच शिवीगाळ करीत होता व त्याने दोरी घेतली व मी फाशी घेतो व तुमच्यावर नाव आणतो अशी धमकी देत होता. त्यानंतर पो.स्टे. पांढरकवडा येथील ठाणेदार साहेब तेथे आले व त्यांनी संदीप ठमके यास ताब्यात घेतले. म्हणून फिर्यादीने सदर फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरून, आरोपी कलम ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भारतीय दंड विधान या गुन्हयाचा तपास पो.उप.निरीक्षक संजीव बापुराव खंदारे यांच्याकडे देण्यात आला. त्याअनुषंगाने त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयान नोंदविले व तपासाअंती आरोपी विरूध्द वरील नमुद कलमांखाली निशाणी क्रमांक ५७ प्रमाणे दोषारोप निश्चित करण्यात आले. व त्याला ते वाचुन दाखविण्यात आले. आरोपींनी सदर दोषारोप निशाणी क्रमांक ५८ ते ६१ वर नाकबूल करून प्रकरणाची संपरिक्षा करण्याची याचना केली. सदर प्रकरणातील आरोपी मुनिंद्र बिरबल खैरे हा मयत झाल्याने त्याच्या विरोधात प्रकरण अबेट करण्यात आले

४. अभियोग पक्षाच्या हकिगतीवरून, पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्याअनुशंगाने मी कारणमिमासेंच्या आधारे खालील निष्कर्ष दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक ११.०८.२०१६ रोजी १७.०० ते १७.३० वाजेच्या सुमारास करंजी रोड ता. केळापुर येथे फिर्यादीच्या घरासमोर आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीची ओढणी ओढली व तिचा विनयशितलेता भंग केला म्हणुन त्यांनी भादवी कलम ३५४ ब प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील नमुद तारिख, ठिकाण, वेळी आरोपीनी गैरकायदयाची मंडळी जमवून व समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ केली म्हणुन त्यांनी भादवी कलम २९४ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील नमुद तारिख, ठिकाण, वेळी आरोपीनी संगनमत करुन गैरकायदयाची मंडळी जमवीली व त्यांचा उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहान करायचा होता म्हणुन त्यांनी भादवी कलम १४३ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने आपसात संगनमत करुन गैरकायदयाची मंडळी जमविली व त्याचा उद्देश दंगल करण्याचा होता व त्याप्रमाणे त्यांनी भादवी कलम १४७ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ ने संगणमत करुन फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली त्याप्रमाणे त्यांनी भादवी कलम ५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| ६. | अंतिम आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिंमासा

५. अभियोगपक्षाने आरोपी विरूध्द दिनांक ११.०८.२०१६ रोजीची कथीत घटना कलम ३५४–ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ भारतीय दंड विधान अंतर्गत साबीत करण्याकरिता एकूण चार साक्षिदार तपासले. साक्षीदार क्र. १ अरविंद शंकरराव पुडके, निशाणी ६५, साक्षीदार क्र. २ वंदना मनोज खैरे, निशाणी ६८, साक्षीदार क्र. ३ सिध्दार्थ भिवाजी

नाळे, निशाणी ७२, साक्षीदार क. ४ संजीव बाबूराव खंडारे, निशाणी ८७ वर तपासले. त्याचप्रमाणे आरोपी यांच्या विरूध्दचे कलम ३१३ फौ.प्र.सं. नुसारचे बयाण निशाणी ९० ते ९३ वर नोंदविण्यात आली.

**<u>मुददा क्रं. १ ते ५</u> :—**

६. सरकारी अभियोक्ता व आरोपींचे वकीलांनी अभिलेखाप्रमाणे युक्तीवाद केला. तसेच आरोपीच्या वकीलांनी निशाणी १०८ प्रमाणे लेखी युक्तीवाद दाखल केला आहे.

७. साक्षीदार क्र. ०२ वंदना मनोज खैरे यांनी आपल्या साक्षेत असे सांगितले की, ते आरोपी क्र. ०१ ते ०३ यांना ओळखतात कारण सर्व आरोपी त्यांच्या घराशेजारी राहतात. घटना दि. ११.०८.२०१६ रोजी संध्याकाळी ५.३० वा. च्या दरम्यान घडली तेव्हा त्या त्यांच्या घरी स्वयंपाक करीत होत्या. त्यांच्यासोबत त्यांची सासू, मुलगा, त्यांची ननद व त्यांचे पती असे हजर होते. त्यावेळेस बाहेर त्यांना आरोपी संदिप यांचा आवाज येवू लागला. तो त्यांना शिवीगाळ करीत होता. 'आली मोठी पोलीस पाटील माझे नाव घेणारी, गावातील दारू बंद करू शकत नाही का तो साले मादरचोद असा बोलत होता, तु माझे काय करशील, मी तुला बघुन घेईन' अशी शिवीगाळ करीत होता. आरोपी संदिप हा त्यांच्या घरासमोर उभा राहून बोलत होता. तेव्हा त्यांनी संदिपला शिवी का देत आहेस असे विचारले आणि तू कोणाला शिवी देत आहेस असे विचारले असता, तो म्हणाला की, 'मी तुला शिव्या देत आहे' शिवीगाळ देताना ढकलढुकल झाली व त्याने त्यांची ओढणी ओढली. तेव्हा त्यांचे पती तिथे आले. त्यांच्या पतीने संदिपला का असा बोलतो असे विचारले तेव्हा आरोपी व त्यांच्या पतीमध्ये ढकलढुकल झाली. तेव्हा घरामागून आनंद बेसेकर आणि मुनिंद्र खैर हे आले व त्यांनी त्यांच्या पतीला मारहाण केली. या मारहाणीमध्ये त्यांच्या पतीला छातीला व मानेला मार लागला. त्यांनी पोलीस स्टेशनला फोन करून घटनेची माहिती दिली. या माहितीवरून पोलीस शिपाई सचिन मरकाम हे घटनास्थळी आले. त्यांना सुध्दा आरोपी संदिप ऐकत नव्हता. इतर आरोपी घटनास्थळावरून निघून गेले होते. आरोपी संदिप हा पोलीस शिपाई सचिन मरकाम यांच्या समोरच हातात दोर घेवून मी स्वत:ला फासी लावतो व तुझे नाव सांगतो असे म्हणत होता. त्यानंतर पोलीस स्टेशनमधून गाडी आली व आरोपी संदिप याला घेवून गेली.

त्यानंतर त्यांनी त्यांचे पतीसोबत पांढरकवडा पोलीस स्टेशन येथे येवून तक्रार निशाणी ६९ व छापील प्रथम खबरी अहवाल निशाणी ७० नोंदविली. त्यानंतर पोलीसांनी वैद्यकीय तपासणी करीता त्यांना पांढरकवडा येथील सरकारी रूग्णालयात पाठविले. दि. १२.०८.२०१६ रोजी पोलीस चौकशीसाठी त्यांचेकडे आले होते. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला. तो घ टनास्थळ पंचनामा त्यांनी व त्यांचे पतीने पोलीसांना दाखविला होता. पोलीसांनी त्यांच्याकडे घ टनेबाबत चौकशी केली.

८. सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासणीत असे सांगितले की, पोलीसांनी त्यांचे बयाण दि. १२.०८.२०१८ रोजी नोंदविले. त्यांनी पोलीसांना त्यांचे बयाण नोंदविता वेळेस असे सांगितले होते की, *'आरोपी संदिप याचा आवाज येवू लागला, माझे नाव घेणारी, गावातील दारू बंद करू शकत नाही का, तो साले मादरचोद असा बोलत होता, तु माझे काय करशील, मी तुला बघून घेईन, आरोपी संदिप हा त्यांच्या घरासमोर उभा राहून बोलत होता, शिवीगाळ करताना ढकलढुकल झाली, आरोपी व त्यांच्या पती मध्ये ढकलढुकल झाली, आनंद बेसेकर, मुनींद्र खैरे घरामागून आले. तसेच त्यांनी मारहाण केली या मारहाणीमध्ये त्यांच्या पतीच्या छातील व मानेला मार लागला हे सुध्दा सांगितले होते''* परंतु, सदर बाबी त्यांच्या पोलीस बयाणात नमुद नसल्याचे कारण सांगण्यास असमर्थता दाखविली. त्यांनी आपल्या उलटतपासणीत पुढे असे कबूल केले की, आरोपी संदिप याने भाजीपाला विक्रीचे दुकान लावले होते. त्यांनी पुढे असे कबूल केले की, आरोपी आनंद बेसेकर हा महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. तसेच आरोपी आनंद बेसेकर हा बाहेरगावी शिकावयास असल्यामुळे त्याला घरी येण्यासाठी रात्रीचे ८.०० ते ८.३० वाजतात. त्यांनी आपल्या उलटतपासणीत दि. ११.०८.२०१६ च्या चार ते पाच दिवसापूर्वी आरोपी संदिप हा त्यांच्या घ री जुगार खेळतो या संशयावरून त्यांनी पोलीसांना बोलाविले होते, त्यावरून आरोपी संदिप यांनी त्यांना जाब विचारला होता, म्हणून त्यांनी त्यांचे पती त्यांची ननद आरोपीच्या घ री जावून आरोपी संदीप याला मारहाण केली होती ही बाब नाकारली. तसेच आरोपींनी त्यांच्याविरोधात सदर घटनेची फिर्याद देवू नये म्हणून सदरची खोटी रिपोर्ट केली ही बाब नाकारली.

९. साक्षीदार क्र. १ अरविंद शंकरराव पुडके, यांनी आपल्या साक्षेत असे सांगितले की, ते पाचही आरोपी व फिर्यादीला ओळखतात. कारण ते सर्व एकाच गावाचे रहिवासी आहेत. पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरिता दि. १२.०८.२०१६ रोजी सकाळी ९.२५ ते १०.०० वा. च्या दरम्यान ग्राम पंचायतच्या रोडवर बोलाविले होते. सदरच्या वेळेस त्यांच्यासोबत सुनिल वनकर, विशाखाताई भेले आणि सुनिल वनकर हे हजर होते. पोलीसांना घटनास्थळ वंदना खैरे यांनी दाखविला. पोलीसांनी सदर जागेची परिक्षण करून नोंद वगैरे केली. सदरचा दि. १२.०८.२०१६ रोजीच्या घटनास्थळ पंचनामा निशाणी ६६ वर त्यांनी सही केली असून त्यातील सर्व मजकूर त्यांनी मान्य केला आहे. सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासणीत असे सांगितले की, ते मागील दहा वर्षापासून मतीमंद मुलांच्या शाळेवर दारव्हा येथे शिक्षक आहे. दि. १२.०८.२०१६ रोजी शाळेला सुट्टी होती. पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता हजर राहण्यासाठी लेखी नोटीस दिली नव्हती. त्यांनी पुढे असे कबूल केले की, फिर्यादीचा पती व ते वर्गमित्र आहेत. दि. १२.०८.२०१६ रोजी रविवार असल्यामुळे शाळेला सुट्टी होती. दि. १२.०८.२०१६ रोजी शुक्रवार होता हे त्यांना आठवत नाही. पोलीसांनी सही करावयाच्या सांगण्याकारणाने त्यांनी सही केली ही गोष्ट त्यांनी नाकारली. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यांनी वाचून सही केली. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामामध्ये ९.२५ ही वेळ लिहली होती. सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासणीत इतर सर्व विरोधी सूचक प्रश्न नकारले.

१०. साक्षीदार क्र. ०३ सिध्दार्थ भिवाजी नाळे यांनी आपल्या साक्षेत असे सांगितले की, ते सर्व आरोपींना ओळखतात. घटना कधी व कोठे घडली होती याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. घटनेच्या वेळेस ते हजर नव्हते. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले नाही. सदर साक्षीदाराला अभियोगपक्षाने सूचक प्रश्न विचारले असताही त्यांनी अभियोगपक्षाला कोणत्याही प्रकारे समर्थन केले नाही.

११. साक्षीदार क्र. ०४ संजीव बाबूराव खंडारे, तपासी अधिकारी, यांनी आपल्या साक्षेत असे सांगितले की, ते दि. ११.०८.२०१६ रोजी पो. स्टे. पांढरकवडा येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. दि. १२.०८.२०१६ रोजी अ.क्र. ९९/२०१६ कलम ३५४

ब, २९४, १४३, १४७, ५०६ भा.द.वी. प्रमाणचे चा तपास त्यांना मिळाला होता. तपासामध्ये त्यांना प्रथम खबरी अहवाल, फिर्याद, पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र असे कागदपत्रे मिळाली होती. त्यांनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने साक्षीदाराचे जाबजबाब नोंदविले. त्यानंतर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. साक्षीदार क्र. ३ सिध्दार्थ नाडे याचे बयाण त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग 'अ' निशाणी ८८ हा त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला आहे. त्यांनी आपल्या उलटतपासणीत असे सांगितले आहे की, त्यांनी साक्षीदार क्र. ०२ चा जवाब तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला आहे. तिने तिच्या बयाणात मला *'आरोपी संदिप याचा आवाज येउ लागला, माझे नाव घेणारी, गावातील दारू बंद करू शकत नाही का? तो साले मादरचोद असा बोलत होता, तु माझे काय करशिल, मी तुला बघून घेईन, आरोपी संदिप हा त्यांच्या द ारासमोर उभा राहून बोलला होता, शिवीगाळ करताना ढकलढूकल झाली, आरोपी व साक्षीदार क्र. ०२ हिच्या पतीमध्ये ढकलढुकल झाली. आनंद बेसेकर, मुनिंद्र खैरे घरामागून आले तसेच त्यांनी मारहाण केली. या मारहाणीमध्ये त्यांच्या पतीला छातीला, मानेला मार लागला. त्यांनी पोलीस स्टेशनला घटनेबाबत फोनद्वारे माहिती दिली होती की, पोलीस शिपाई सचिन मरकाम हे त्यांनी दिलेल्या माहितीवरून आले होते, त्यांना सुध्दा आरोपी संदिप ऐकत नव्हता'* असे तिने तिचे बयाण नोंदविताना सांगितले नव्हते. व इतर सर्व विरोधी सूचक प्रश्नांना नकारले.

१२. वरील चारही साक्षीदारांची साक्ष विचारात घेता असे दिसून येते की, जरी साक्षीदार क्र. ०१ अरविंद पुडके याने घटनास्थळ पंचनामा सिध्द केला आहे. परंतु, त्यांनी आपल्या उलटतपासणीत फिर्यादीसोबत त्यांचे चांगले संबंध असल्याचे कबूल केले तसेच फिर्यादीचे पती त्यांचे वर्गमित्र असल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. तसेच दि. १२. ०८.२०१६ रोजी रविवार होता किंवा शुक्रवार होता तसेच त्यादिवशी साक्षीदार कामानिमित्त शाळेला गेला होता किंवा त्यादिवशी सुट्टी होती ही बाब स्पष्टपणे अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षेवर साशंकतता निर्माण होते. साक्षीदार क्र. ०३ यांनी कोणत्याही प्रकारे अभियोगपक्षाला समर्थन केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाच्या समर्थनात नाही.

१३. यानंतर साक्षीदार क्र. ०२ फिर्यादी अतिमहत्वाचे साक्षीदार यांनी आपल्या साक्षेत स्पष्टपणे घटना सांगितली. परंतु, त्यांनी आपल्या उलटतपासणीत असे कबूल केले की, त्यांनी पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविता वेळेस असे सांगितले होते की, *'आरोपी संदिप याचा आवाज येवू लागला, माझे नाव घेणारी, गावातील दारू बंद करू शकत नाही का, तो साले मादरचोद असा बोलत होता, तु माझे काय करशील, मी तुला बघून घेईन, आरोपी संदिप हा त्यांच्या घरासमोर उभा राहून बोलत होता, शिवीगाळ करताना ढकलढुकल झाली, आरोपी व त्यांच्या पती मध्ये ढकलढुकल झाली, आनंद बेसेकर, मुनींद्र खैरे घरामागून आले. तसेच त्यांनी मारहाण केली या मारहाणीमध्ये त्यांच्या पतीच्या छातील व मानेला मार लागला हे सुध्दा सांगितले होते''* परंतु, सदर बाबी त्यांच्या पोलीस बयाणात नमुद नाही. सदर बाबी तपासी अधिकारी यांना विचारले असताही त्यांनी सदर साक्षीदाराने आपल्या बयाणात वरील बाबी सांगितली नाही असे कबूल केले. त्यामुळे वरील बाबी सदर साक्षीदाराने आपल्या साक्षेत पहिल्यांदा सांगितली. अशा प्रकारची उणिव हि महत्वाची सुधारणा ठरते व साक्षीदाराच्या कथनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. यानंतर सदरची घटना ५.३० वा. ची असल्याचे फिर्यादीने सांगितले व त्यांनी आपल्या उलटतपासणीत असे कबूल केले की, आनंद बेसेकर हा बाहेरगावी शिकण्यास जातो व रात्री ८.०० ते ८.३० वा. येतो. त्यामुळे आरोपी आनंद बेसेकर घटनास्थळी होता किंवा कसे ही बाब स्पष्टपणे अभिलेखावर आलेली नाही. तसेच सदर साक्षीदारही फक्त आरोपी आनंद बेसेकर, मुनिंद्र खैरे तसेच संदिप ठमके यांच्याविरूध्द कथन केले. सदर साक्षीदाराची साक्ष संपूर्ण विचारात घेता त्यांनी कुठेही आरोपी यशोदाबाई बेसेकर तसेच आरोपी गर्जन खैरे यांच्याविरूध्द कोणतेही कथन केले नाही. सदर प्रकरण हे फिर्यादीच्या घरासमोर घडलेले आहे व फिर्यादीच्या कथनेनुसार आरोपी यांनी त्यांच्या पतीला ढक्कलढुक्कल करून मारहाण केली. सदर प्रकरणात फिर्यादीचा पती मनोज खैरे यांची साक्ष अतिमहत्वाची होती. सदर प्रकरणात त्यांची साक्ष घेण्यात आली नाही. तसेच अभियोगपक्षाने निशाणी १०५ प्रमाणे पुरसिस दाखल केली की, मनोज खैरे यांनी अभियोगपक्षाला समर्थन केले नाही. म्हणून त्यांची साक्ष घेण्यात आली नाही. सदर साक्षीदार मनोज खैरे हा अतिमहत्वाचा साक्षीदार होता ज्यांच्यासमक्ष सदर घटना घडली. परंतु, अभियोगपक्ष त्यांची साक्ष घेण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे घटनेबद्दल कोणताही सबळ पुरावा

अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादीच्या कथनेनुसार आरोपी संदीप ठमके यांनी त्याची ओढणी ओढली ही बाब कोणत्याही सबळ पुराव्यानिशी सिध्द झाली नाही. तसेच अभियोगपक्षाने सदर बाबी सिध्द करण्याकरिता तसेच फिर्यादीच्या कथनेला दुजोरा देण्याकरिता कोणतेही साक्षीदार तपासले नाही. सबब, आरोपी यांनी मिळून बेकायदेशिर मंडळी जमवून दंगल करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ केली व फिर्यादीच्या पतीला मारहाण केली तसेच त्यांना जिवाने मारण्याची धमकी दिली ही बाब सिध्द होत नाही.

१४. वरील सर्व साक्षीदारांची साक्ष विचारात घेता आरोपी हे साशंकतेचा फायदा घ ेण्यास पात्र आहे. त्यामुळे कोणतेही दस्तऐवज पुरावा कायदयानुसार सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपी विरूध्द कलम ३५४—ब,२९४, १४३, १४७, १४९, ५०६ मधील नमुद घटक फिर्यादीच्या मौखिक साक्षीतुन किंवा कोणत्याही दस्तऐवजाविना सिध्द होत नाही.

१५. तसेच अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द केला असला तरी सदर पंचनामा संबंधीत घटनेशी फिर्यादीने व इतर साक्षीदाराने दिलेल्या अपु—या पुराव्यामुळे स्थापीत होत नाही. तसेच आरोपींने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ तसेच तिची ओढणी ओढून विनयभंग केला व तिच्या पतीला धक्काबुक्की करून मारहाण केली हेही सिध्द होत नाही. करीता आरोपीस सदर साक्षीच्या अनुषंगाने आरोपींना दोषी ठरविणे योग्य होणार नाही. करीता वरील विवेचनावरून मी मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी देते.

**<u>मुददा क्रं. ६</u>**:—

१६. मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी दिल्याने व आरोपीचा घटनेशी संबंध स्थापीत न झाल्याने मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१) आरोपी **संदिप चंदमणी ठमके, आनंद भारत बेसेकर,**

**श्रीमती यशोदाबाई भारत बेसेकर, गर्जन बिरबल खैरे, मुनिंद्र बिरबल खैरे (मयत)** यांना कलम २४८(१) फौजदारी प्रक्रिया संहीता अंतर्गत कलम ३५४—ब, २९४, १४३, १४७, १४९, ५०६ भारतीय दंड विधान अनुसार शिक्षापात्र दोषारोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींनी कलम ४३७—अ च्या अनुपालणा करीता दिलेल्या रू. १०,०००/— प्रत्येकी बंधपत्र व जामिनपत्र निशाणी १०९ प्रमाणे कायम ठेवण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत)

AMREEN MOHAMMAD KASIM

Digitally signed by AMREEN MOHAMMAD KASIM
Date: 2026.05.30 15:43:51 +0530

(कु. अमरीन एम. कासीम)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
केळापुर — कोर्ट नं. १

दिनांक : ३०.०५.२०२६